REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २२ जानेवारी १९४७ अंक ४


## दी तोरगल इन्डस्ट्रीज, लिमिटेड.

पेट्रन:

**श्री. नरसोजीराव ऊर्फ बाबासाहेब शिंदे,**
जहागिरदार, तोरगल.

**अधिकृत भांडवल : रु. ५,००,०००**

**विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००,०००**

( ११,००० ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. २५ चा व ४,००० पांच टक्के ( इन्कमटॅक्स फ्री ) प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. ५० चा, मध्यें विभागलेलें ).

शेअरच्या भरणा करणेच्या रकमा :

| | अर्जासोबत | अर्जमंजूरीवर |
|---|---|---|
| ऑर्डिनरी शेअर्स | रु. ५ | रु. १० |
| प्रेफरन्स शेअर्स | रु. २५ | रु. २५ |

ऑर्डिनरी शेअरवर राहिलेले प्रत्येकीं रु. १० कंपनी मागवील त्यावेळीं रु. ५ च्या हप्त्यानें भरावयाचे, पण अशी मागणी केव्हांहि तीन महिन्यांपेक्षां कमी नाहीं, अशा मुदतीनेंच करण्यांत येईल.

प्रेफरन्स शेअरवर ५ टक्के ( इन्कमटॅक्स फ्री ) प्रेफरन्शिअल डिव्हिडंड मिळेल.

कोल्हापुरांतील नामांकित व्यक्ती त्या कंपनीचे डायरेक्टर्स असल्यामुळें कंपनीचा कारभार काटकसरीचा चालून सर्व व्यवहार शेअर होल्डरांचे हिताचाच होण्याबद्दल शंका नाहीं.

शेअर खरेदीकरतां सर्व माहिती कंपनीचे हेड ऑफिसमध्यें मिळूं शकेल.

कंपनीस अमेरिकन एक्स्पेलर्ससह ऑईल मिलला लागणारी संपूर्ण मशिनरी मिळाल्यामुळें फॅक्टरी उभारण्याचें काम सुलभ झालें आहे.

मॅनेजिंग एजंटस : मेसर्स जी. के. अॅन्ड कंपनी.

दी तोरगल इन्डस्ट्रीज लि. महाद्वार रोड, कोल्हापूर.



## —संक्रमण—

आमचे ग्राहक, ठेवीदार आणि हितचिंतक यांसः—

उद्यम मंडळ या नांवानें गेलीं आठ वर्षें चालू असलेल्या कारखान्याचें रूपांतर

' उद्यम एंजिनिअरिंग लिमिटेड '

या नांवांत झालें आहे. लिमिटेड कंपनीचें कार्यालय आणि कारखाना २८१ शुक्रवार, पुणें १ येथेंच आहे.

उद्यम मंडळ ( मॅनेजिंग एजंटस )
यांचेकडून प्रकाशित



—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, तमढेरे बोळाजवळ, पुणें २

## विविध माहिती

**बँक ऑफ बरोडा लि.**— ह्या बँकेचा १९४६ सालांतील नफा २९ लक्ष रु. झाला. भागीदारांस १०% डिव्हिडंड व १ रु. बोनस मिळणार आहे. दोन्ही करमाफ आहेत.

**अमेरिकेंत कागद मुबलक आहे**—अमेरिकेंतील वृत्तपत्रें आतां युद्धापूर्वीच्या आपल्या आकारांत निघूं लागलीं आहेत आणि बहुतेकांचीं पृष्ठें ३० ते ६० ह्यांच्या दरम्यान असतात. 'शिकॅगो संडे ट्रिब्यून' नें नुकताच एक २७६ पृष्ठांचा अंक प्रसिद्ध केला.

**गिळलेलें नख**—ऑस्ट्रेलियांतील एका मुलीनें लहानपणीं बोटाचें नख गिळलें तें तिच्या १६ व्या वर्षी समजून आलें. तें काढण्यासाठीं शस्त्रक्रिया करण्याकरितां तिला अमेरिकेस पाठविण्यांत आलें. खर्चाला लागणारे ४० हजार रुपये वर्गणीच्या रूपानें जमविले गेले.

**कर चुकाविणारांची संख्या**—ज्यांचेकडे इन्कम टॅक्सची बाकी असेल, अशांचीं नांवें फ्रेंच टाऊन हॉलांतून लावण्याची कल्पना फ्रेंच सरकारचे फडणवीस ह्यांनीं पुढें मांडली आहे.

**पांच दिवसांचा आठवडा**—ग्रेट ब्रिटनमधील कोळशाच्या खाणी तेथील सरकारनें ताब्यांत घेतल्यानंतर चार महिन्यांनीं खाणी कामगारांना आठवड्यांतून फक्त पांचच दिवस काम करावें लागेल.बहुधा १ मे पासून हा पांच दिवसांचा आठवडा सुरू होईल.

**ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शनांत हिंदुस्थान भाग घेणार**—सिडने (ऑस्ट्रेलिया) येथें ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शन मार्च, १९४७ मध्यें भरविण्यांत येणार आहे. त्यांत भाग घेण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. ऑस्ट्रेलिया व शेजारचे देश ह्यांचेशीं व्यापार वाढावा हा त्याचा उद्देश आहे.

**क्लच व गिअर नसलेली मोटार**—इन्व्हिक्टा "ब्लॅक प्रिन्स" नांवाच्या मोटार गाडीचें लंडनमध्यें नुकतेंच प्रदर्शन करण्यांत आलें. ह्या गाडींत क्लच व गिअर लिव्हर नाहीं. त्यामुळें, मोटार चालविणारानें हातांतील चाक, ॲक्सिलरेटर व ब्रेक ह्या तीन गोष्टी संभाळल्या म्हणजे पुरें. गाडी स्तब्ध उभी असतांना, ती पुढें किंवा मागें चालविण्यासाठीं आणखी एक स्वतंत्र स्विच ठेवण्यांत आला आहे. गाडीची किंमत ४० हजार रुपयांवर जाईल.

**राजेसाहेबांचा द. आफ्रिकेचा प्रवास**—ग्रेट ब्रिटनचे राजे, राणी व दोन्ही राजकन्या दक्षिण आफ्रिकेस ३१ जानेवारी रोजीं निघणार आहेत. त्याची पूर्वतयारी म्हणून राजकन्या द. आफ्रिकेंतील स्थानिक भाषेचें ('आफ्रिकान्स' चें) शिक्षण घेत आहेत. द. आफ्रिकेंत आगगाडीचा प्रवास ज्या डब्यांतून हें राजकुटुंब करणार आहे, त्याची पहाणी त्यानें नुकतीच केली. ग्रेट ब्रिटनमधील एका कंपनीकडेच डबे तयार करण्याचें काम दिलेलें आहे. राजेसाहेबांचा द. आफ्रिकेचा दौरा संपला म्हणजे हे डबे तेथेंच ठेवून घेण्यांत येतील व तेथील गव्हर्नर जनरल आपल्या प्रवासासाठीं त्यांचा उपयोग करतील.

**मद्रास को. सें. लँड मॉर्गेज बँक लि.**—वरील बँकेचें वसूल भांडवल ११, २८, ७०० रु. व रिझर्व्ह १७, २०, ३६८ रु. झाला आहे. बँकेनें दिलेल्या कर्जांची रक्कम २ कोटि, ४२ लक्ष रुपये असून त्यास ८ कोटि, २५ लक्ष रुपये किंमतीची २, २३, १८० एकर जमीन तारण आहे. बँक प्राथमिक बँकांना ५% व्याज आकारते व त्या बँका ६% व्याज घेतात. बँकेस जोडलेल्या ११८ बँकांपैकी २५ प्राथमिक बँका तोट्यांत आहेत. १९४५–४६ च्या रिपोर्टावरून ही माहिती मिळते.

**गुळावर पुनः कंट्रोल**—गुळाच्या भावाचें पुनः नियंत्रण करण्याचें मुंबई सरकारनें ठरवून त्याप्रमाणें किंमती निश्चित केल्या आहेत.


# साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितिमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी

लग्नसमारंभास व मेजवानीसाठीं

—रुप्रॉक्सचा—

शुद्ध साखरेचा केशरयुक्त

# :: सुधारस ::

## वापरा

बाटली किंमत २–८–०

घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.

मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज, ६५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) | | विश्वास (चार बैली) |
| किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) | | वासुदेव (दोन बैली) |
| किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) | | राजा (एक बैली) |

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

**एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत**

# अर्थ

बुधवार, ता. २२ जानेवारी १९४७


संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

# शेतीची पंचवार्षिक योजना

## वाढत्या लोकसंख्येच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न

मध्यवर्ती सरकारचे अन्न–मंत्री बाबू राजेंद्रप्रसाद, यांनीं अन्न–परिषदेमध्यें केलेल्या भाषणांत हिंदुस्थानांतील अन्नधान्याच्या उत्पादनासंबंधीं एका पंचवार्षिक योजनेची घोषणा केली आहे. हिंदुस्थानांत अन्नधान्याचा तुटवडा भासूं लागल्यापासून प्रांतिक सरकारें आपआपल्या परीनें अधिक अन्नधान्याच्या निर्मितीचे प्रयत्न करीत असलीं तरी मध्यवर्ती राष्ट्रीय सरकारच्या अभावामुळें त्या प्रयत्नांत एकसूत्रता येणें जवळ जवळ अशक्यप्रायच झालें होतें. परंतु आतां, देशांतील दोन प्रमुख राजकीय पक्ष अधिकारपदावर आल्यामुळें आणि अन्नधान्याचा प्रश्न राजकीय पक्षाभिनिवेशाच्या कक्षेच्या बाहेर असल्यामुळें, तो सुटण्यास योग्य ती परिस्थिती उत्पन्न झाली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. हिंदुस्थानांतील अन्नधान्याचा तुटवडा भरून काढण्यासाठी परदेशांतून अन्नधान्य आयात करावें लागलें; आणि हें अन्नधान्य देशांतील चढता बाजारभाव लक्षांत घेऊन आयात करण्यासाठी सरकारला १५ कोटी रुपये मदतीदाखल अधिक द्यावे लागले, ही गोष्ट अन्नमंत्र्यांनीं मागें एकदा व आताही स्पष्टपणें सांगितली आहे. अशा रीतीनें अन्नधान्याच्या आयातीवर सालोसाल खर्च करणें हिंदुस्थानला परवडणार नाहीं हें उघडच आहे. त्यापेक्षां देशांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें येवढाच उपाय इष्ट व अंतिम फलाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे आणि याच उपायाची योजना अन्नमंत्र्यांनी आपल्या भाषणांत रूपरेषेनें सांगितली आहे.

सध्यां हिंदुस्थानांतील अन्नधान्याची वार्षिक तूट सुमारें १५ लाख टनांच्या आसपास आहे. हिंदुस्थानांतील लोकसंख्येची येत्या पांच वर्षांत म्हणजे १९५१ अखेरपर्यंत होणारी वाढ लक्षांत घेतां वरील वार्षिक तुटीचा आकडा ७० लाख टनांपर्यंत फुगेल असा अंदाज अन्नमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केला आहे. ही आंकडेवारी लक्षांत घेतली म्हणजे अन्नधान्याची टंचाई त्यावेळीं किती गंभीर स्वरूप धारण करील याची थोडीबहुत कल्पना करतां येईल. सध्यां लागवडींत असणाऱ्या जमिनींत दर एकरीं अधिक पीक काढणें हा अन्नधान्याची पैदास वाढविण्याच्या उपायांपैकीं एक महत्वाचा उपाय आहे. या पैदाशींत १९५१ अखेर ११॥ टक्क्यांनीं वाढ करण्याचें ध्येय योजनेंत जाहीर करण्यांत आलेलें आहे. दर एकरीं अधिक उत्पादन करण्याच्या भाषेंत बोलावयाचें तर सध्यां दर एकरीं सरासरी १० मण अन्नधान्य उत्पादन होतें तें योजनेच्या अखेर ११॥ मण उत्पन्न व्हावें असे प्रयत्न करण्यांत यावयाचे आहेत. योजनेच्या पूर्तीसाठी अन्नमंत्र्यांनीं चार साधनें सांगितलीं असून तीं सर्वमान्य होण्यासारखींच आहेत. तीं साधनें अशीं: ( १ ) पाणी पुरवठ्याच्या सवलती ( २ ) चांगलें बीं–बियाणें ( ३ ) अधिक खत ( ४ ) जमिनी कसण्याची आधुनिक सुधारलेली पद्धत. या चतुःसूत्रीचा अवलंब केल्यानें देशांतील अन्नधान्य परिस्थितींत पांच वर्षांच्या अवधींत इष्ट तो फरक पडेल असा आत्मविश्वास बाळगण्यास हरकत नाहीं. पाणी पुरवठ्यासाठी योजना म्हटली म्हणजे मोठमोठीं धरणेंच एकदम नजरेसमोर येतात. परंतु अशा धरणांची आवश्यकता कबूल करूनही लहानसहान पाटबंधाऱ्यांनींसुद्धां पाणीपुरवठ्याचा प्रश्न बराच समाधानकारक रीतीनें सोडवतां येईल. मोठीं धरणें बांधण्यासारखी भौगोलिक परिस्थिती सर्वच ठिकाणीं असेल असें नाहीं. तेव्हां स्थानिक भूगोल लक्षांत घेऊन छोट्या तलावांनी पाणी–पुरवठा करतां येत असेल तर तसा तो करणें आवश्यकच आहे. शिवाय अशा बारिक सारिक पाणी पुरवठ्याच्या कामांना जो पैसा लागेल तो उभारणें फारसें अवघड जात नाहीं. खताबाबत अन्नमंत्र्यांनी दिलेला सल्लाही उपयुक्त व तज्ञांनी मान्य केलेला आहे. कृत्रिम रीत्या तयार केलेलीं रासायनिक खतें आवश्यक असलीं तरी गुरांढोरांपासून उत्पन्न होणारें खतही कांहीं कमी दर्जाचें असतें असें नाहीं. पण हिंदुस्थानांतील गुरांची संख्या घटल्यामुळें हें खत पुरेसें मिळूं शकत नाहीं आणि त्यांतही गरीब शेतकरी या खताचा उपयोग शेण्या लावून जळणासाठी करतात. त्यामुळें शेत–जमिनीला मिळणारें नैसर्गिक खत कमी होतें. एकंदरींत केवळ तांत्रिक दृष्टीनें पाहतां अन्न–धान्याच्या वृद्धीची योजना समाधाकारक असली तरी तिला निरनिराळ्या प्रांतांतील प्रांतिक सरकारें कितपत पाठिंबा देतात यावरच तिचें यशापयश अवलंबून राहील हिंदुस्थानच्या खनिज संपत्तीचा सूत्रबद्ध उपयोग करण्याच्या योजनेला कांहीं प्रांतांकडून विरोध झालेला प्रसिद्धच आहे. तसाच विरोध किंवा असहकार या योजनेला झाला तर मात्र योजना कागदावरच राहील. वरील योजनेंत एका महत्त्वाच्या मुद्याचा उल्लेख अवश्य असावयास पाहिजे होता. हिंदुस्थानांत स्वतःच्या मालकीची जमीन नसणारे शेतमजूर आहेत आणि पडिक पण लागवड करण्यासारखी जमीनहि आहे. या दोघांची सांगड घालून देऊन अन्नधान्याचा प्रश्न अधिक त्वरित सोडवितां येणार नाहीं काय?

## अमेरिकन सरकारचें अंदाजपत्रक

### अवाढव्य आकडे

प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं अमेरिकन काँग्रेसला सरकारचें येत्या वर्षाचें अंदाजपत्रक ता. १० रोजीं सादर केलें, त्याची रकम सुमारें १३,००० कोटि रुपये भरते! अपेक्षेप्रमाणें उत्पन्न व खर्च झाल्यास, वर्ष अखेर वाढावा उरणार आहे. १९३० सालापासून आतांपर्यंत अमेरिकन सरकारच्या वार्षिक हिशेबांत वाढावा दिसला नव्हता. येत्या वर्षीचा अपेक्षित वाढावा ६०० कोटि रुपये आहे. हिंदुस्थान सरकारचें एकुण अंदाजपत्रक १९३८–३९ मध्यें ८५ कोटि रुपयांचें होतें, तें आतां ३०० कोटि रुपयांवर गेलें आहे, आणि १९४६–४७ मधील तुटीचा अंदाज ४९ कोटि रुपयांचा आहे. त्या आकड्यांशीं अमेरिकन अंदाजपत्रकांतील आकड्यांची तुलना केली, म्हणजे त्या देशाच्या अवाढव्य आर्थिक संसाराची कल्पना येईल.

### लष्करी खर्च

अमेरिकेच्या अंदाजपत्रकांतील खर्चाची सर्वांत मोठी बाब लष्करी खर्चाची आहे. त्यावर सुमारें ४,००० कोटि रुपये खर्च होणार आहेत. १९४६ सालीं हा आकडा ५,००० कोटि रुपये होता. १९४५ सालीं तो आकडा ३२,००० कोटि रुपयांवर गेला होता. आपली युद्धजन्य जबाबदारी पार पाडण्यासाठी व युरोप आणि अतिपूर्वेकडील देश ह्यांच्या लष्करी ताब्यासाठी अमेरिकेला मोठा खर्च करावा लागत आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेमुळें जागतिक शांततेस सहाय झालें तरी आजच आपलें लष्करी सामर्थ्य कमी करणें अमेरिकेच्या आजच्या आंतरराष्ट्रीय स्थानास विघातक होईल, असा प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं खुलासा केला आहे. लष्करी खर्चाच्या अंदाजानें एकूण १६,४१,००० सैनिकांची तरतूद केलेली आहे. लष्करांतून परतलेल्या सैनिकांचें शिक्षण, पेन्शन, बेकारीभत्ते रजा, विमे, वैद्यकीय मदत, इत्यादींवर येत्या वर्षी अमेरिकन सरकार सुमारें २,५०० कोटि रुपये खर्चणार आहे. राष्ट्रीय कर्जाचे व्याजासाठी १,७०० कोटि रुपये लागणार आहेत.

# स्फुट विचार

## ब्रिटिश कारखाने व कोळसा वाटप

ब्रिटनच्या उद्योगधंद्यांस दगडी कोळशाच्या उत्पादनाला सर्वांत अधिक महत्त्व आहे. किंबहुना ब्रिटिश जनतेचें जीवनच कोळशाच्या खाणींत सांठवलेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रिटनमधील कारखान्यांना जळणासाठी कोळशाचाच उपयोग करावा लागतो. रेल्वे व हातूक दगडी कोळशाच्या पुरवठ्यावर अवलंबून, विजेची निर्मिती दगडी कोळशावर अवलंबून, कापडाच्या गिरण्याही दगडी कोळशावर अवलंबून, असा प्रकार आहे. गेल्या कांहीं वर्षांत ब्रिटनमधील कोळशाचें उत्पादन घटत चाललें होतें त्याला अनेक कारणें असलीं तरी कोळसा कामगारांच्या संख्येंत झालेली घट हीच मुख्यतः कमी उत्पादनाला कारणीभूत झालेली होती. युद्धोत्तर मजूर सरकार अधिकारावर आल्यावर निवडणुकींतील वचनाप्रमाणें कोळशाच्या खाणी नुकत्याच राष्ट्रीय मालकीच्या करण्यांत आल्या आहेत. मजुरांच्या न्याय्य गाऱ्हाण्यांची दाद लागून कोळशाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न मजूर सरकार करीत आहे. परंतु दरम्यान कोळशाच्या टंचाईमुळें कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या कोळशांत कपात करण्यांत येणार असल्याचें बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनीं जाहीर केलें आहे. ही कोळशाची कपात व पुरवठा करताना धंद्यांच्या महत्त्वाच्या अनुक्रमानें विचार न करतां पृथक्पणें कारखान्याच्या महत्त्वाचा विचार करण्यांत आलेला आहे असें त्यांनींच जाहीर केलें आहे. म्हणजे असें कीं, कापडाच्या गिरणीचीं यंत्रें तयार करणाऱ्या सर्व कारखान्यांचा साकल्यानें विचार न करतां, निर्यात व्यापार करणाऱ्या कापड गिरण्यांच्या कोळशाच्या गरजेचा विचार अधिक करण्यांत आला असावा. वास्तविक ब्रिटनमधील यांत्रिक अवजारें तयार करण्याच्या कारखान्यांना अधिक महत्त्व दिलें गेलें पाहिजे. पण जगाच्या बाजारपेठांत मागें पडावयाचें नसेल तर ब्रिटनला तूर्त कांहीं वर्षें याच धोरणानें चालावें लागणार, कारण ब्रिटिश बाजारपेठा आतां पूर्वींसारख्या संरक्षित राहिलेल्या नाहींत.

---

## सोन्याच्या उत्पादनाचे कांहीं आकडे

आंतरराष्ट्रीय व्यापारांत निरनिराळ्या देशांच्या चलनाची देवघेव ही सोन्याच्या साठ्यावर बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असते. अर्थांत सोन्याचा साठा सुद्धा आयात-निर्यातीच्या भरती ओहोटीवर अवलंबून असतो. ज्या देशांचा निर्यात व्यापार अधिक मोठ्या प्रमाणावर असतो त्या देशांत मामुली व्यापार चालला तर सोन्याचा साठा अधिक होऊं शकतो. तथापि कांहीं प्रमाणांत युद्धापूर्वीं व आतां युद्धोत्तरही मामुली आंतरराष्ट्रीय व्यापार चालू नव्हता व नाहीं. कारण आयात निर्यातीवरच नियंत्रण घालण्याच्या प्रथा पडल्या आणि अर्थांतच सोन्याची आवक-जावकही नियंत्रित होऊं लागली. आंतरराष्ट्रीय व्यापारांत सोनें पूर्वींचे म्हणजे खुला व्यापार चालू असतांना असलेलें स्थान मिळवील कीं नाहीं याविषयीं तज्ज्ञांतच मतभेद आहेत. तथापि एकंदरीनें जगांतील सोन्याचें उत्पादन वाढत असून जगांतील चलनाला तारण म्हणून त्याचा उपयोग अधिक प्रमाणांत करण्यांत येत आहे. त्या मताविषयींही कांहीं तज्ज्ञ शंका प्रदर्शित करीत आहेत. आतां सोन्याच्या उत्पादनाचे कांहीं आंकडे पाहूं. १४९३ ते १८८३ च्या दरम्यान सोन्याचें सरासरी वार्षिक उत्पादन १० लाख औंसांपेक्षा कमी होतें. १८८४ ते १९०२ पर्यंत तें ८·७ दशलक्ष औंसांपर्यंत पोचलें; १९०३ ते १९०९ पर्यंत १९ दशलक्ष औंस, १९२० सालीं १८ दशलक्ष औंस, १९३० सालीं २९·१७ दशलक्ष औंस आणि १९४० सालीं ४१ दशलक्ष औंस. त्यानंतर सोन्याचें उत्पादन पुन्हां घटलें व आज तें २७ दशलक्ष औंस आहे. सोन्याच्या उत्पादनाच्या किंमतींतहि वाढ झालेली आहे. इतर उद्योगधंद्यांतील उत्पादनाच्या किंमतीची वाढ गिऱ्हाइकावर बसविता येते, पण सोन्याचें तसें होत नाहीं, कारण सोन्याची किंमत मागणी व पुरवठ्याच्या रस्सीखेचीनें ठरत नसून आंतरराष्ट्रीय चलनाच्या व्यवहारांत निरनिराळे देश जें धोरण ठरवितात त्यावर अवलंबून असते. गेल्या कांहीं वर्षांत सोन्याचें माध्यम बाजूला सारून मोठ्या प्रमाणावर वस्तूंची परस्पर देवघेव करण्याचे प्रयत्न कांहीं राष्ट्रांनीं केले. तीच प्रवृत्ती वाढत गेली तर सोन्याचें आंतरराष्ट्रीय व्यापारांतील महत्व कमी होत जाईल.

---

## सुट्यांची संख्या पूर्ववत् होणार नाहीं

युद्धापूर्वीं मुंबई प्रांतांत सार्वजनिक सुटीचे असलेले दिवस १९४२ सालीं सरकारनें कांहीं प्रमाणांत कमी केले. युद्धोपयोगी मालाचें अधिकांत अधिक उत्पादन व्हावें, हा त्यामध्यें हेतु होता. आतां युद्ध संपलें असल्याकारणानें सुट्यांची संख्या पूर्ववत् करावी काय, हा प्रश्न उपस्थित झाला व समाजाच्या जीवनाची वाढती गति लक्ष्यांत घेतां कामाचे दिवस ज्यास्तींत ज्यास्त असणें इष्ट आहे असें सरकारनें ठरवून सुट्यांची संख्या युद्धपूर्वकालाइतकी न करण्याचें जाहीर केलें आहे. सुटीच्या दिवशीं काम बंद असलें तरी कारखान्यांचा किंवा कंपन्यांचा भाडें, व्याज, पगार, इत्यादि खर्च कायमच रहातो आणि यंत्रसामुग्री बंद रहाते. सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितींत ही गोष्ट जितकी टाळतां येईल तेवढी टाळली पाहिजे. हिंदुस्थानांत सार्वजनिक सुट्यांची संख्या पाश्चात्य पुढारलेल्या देशांतील सुट्यांच्या मानानें फार मोठी आहे, हें सुप्रसिद्धच आहे. व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांस सुट्यांमुळें अडथळा येतो ह्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील सुट्या कमी करणें आवश्यकच ठरतें. वेगवेगळे धर्म आणि पंथ ह्यांच्या दृष्टीनें ठरविलेल्या सुट्या कमी करणें फार कठीण आहे. तेव्हां युद्धकाळांत कमी केलेल्या सुट्या पुनः सुरू न करण्याचें मुंबई सरकारचें धोरण स्वागतार्ह समजलें पाहिजे. युद्धापूर्वीं मुंबई प्रांतांत २८ सार्वजनिक सुट्या होत्या. १९४२ सालीं त्यांची संख्या १९ करण्यांत आली, राजाच्या वाढदिवसाची सुटी १९४६ सालीं पुनः सुरू करण्यांत आल्यावर सुट्यांची संख्या २० झाली. म्हणजे, ८ सार्वजनिक सुट्या आतां कायमच्या रद्द झाल्या आहेत. रविवारची सुटी वगळली असतां वर्षांतून केवळ ६ च दिवस ब्रिटिश बँका बंद असतात. हिंदुस्थानांतील बँकांच्या सुटीचे दिवस त्याच्या चार पट आहेत. बँकांच्या सुट्यां हें राष्ट्रीय औद्योगिक प्रगतीचें लक्षण मानल्यास सुटीचे दिवसांची संख्या दर्शविणारे खालील आकडे उद्बोधक वाटतील:—

| | | | |
|---|---|---|---|
| युगोस्लाव्हिया | ४० | पोलंड | ३४ |
| हिंदुस्थान | २४ | स्वित्सरलंड | १६ |
| फिन्सलंड | १५ | फ्रान्स | १४ |
| इटली | १४ | जर्मनी | १२ |
| ग्रेटब्रिटन | ६ | स्कॉटलंड | ४ |

---

## लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रियल म्यूझियम ॲक्ट, १९४७

वरील कायद्याचा मसुदा प्रसिद्ध झाला आहे. म्यूझियमचें कार्य कायम व्यवस्थितपणें चालण्याच्या दृष्टीनें त्याची मांडणी करण्यांत आली आहे. ५,००० रु. देणारे पेट्रन; ५०० रु. देणारे आजीव सभासद; १०० रु. देणारे डोनर; वार्षिक १० रु. देणारे साधारण सभासद अशी सभासदांची वर्गवारी केली आहे. व्यवस्था पहाण्यासाठी ट्रस्टींचें एक बोर्ड नेमलें जाईल. मध्यभाग कमिशनर, डिस्ट्रिक्ट जज्ज, डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज किंवा त्यांचा प्रतिनिधि आणि मुंबई सरकारनें नेमलेले दोन अधिकारी ह्यांचा त्या बोर्डांत समावेश होईल. त्याचप्रमाणें पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचे ५ प्रतिनिधी अधिकारपरत्वें बोर्डावर येतील. इतरहि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी बोर्डावर येऊं शकतील अशी तरतूद केलेली आहे. म्यूझियमच्या सभासदांपैकीं चौघे जण निवडणुकीच्या मार्गानें बोर्डावर येतील. डेक्कन ॲग्रि. असोसिएशन, पुणें व मराठा चेंबर, पुणें ह्यांस आपले दोन प्रतिनिधी धाडण्याचा अधिकार दिलेला आहे. रानडे इकनॉमिक इन्स्टिट्यूट व गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड इकनॉमिक्स ह्यांचे दोन प्रतिनिधी सरकार नेमील. पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष बोर्डाचे चेअरमन असले तरी कमिशनर किंवा डिस्ट्रिक्ट जज्ज हे गैरहजर असतील तेव्हांच त्यांना बोर्डाचे अध्यक्षस्थानीं बसतां येईल. सेक्रेटरीच्या सहायानें बोर्ड आपलें काम करील. अकौंटंट जनरलनें पाठविलेला ऑडिटर हिशेब तपासील.

## सांडू ब्रदर्स चेंबूरच्या कारखान्यास म्हैसूर आयुर्वेदिक व युनानी विद्यार्थ्यांची भेट

श्रीमान् पंडीत एन्. एल्. भट्टाचार्य, फिजिशिअन व लेक्चरर, गव्हर्नमेंट आयुर्वेदिक व युनानी कॉलेज, म्हैसूर ह्यांनीं आपल्या १२ छात्रगणांसह १५ जानेवारी रोजीं दुपारीं सांडू ब्रदर्स चेंबूर कारखान्याच्या वेगवेगळ्या विभागासंबंधीं आस्थापूर्वक माहिती घेऊन व्यवस्थेबद्दल आनंद व्यक्त केला व सुयश चिंतिलें. औषधी तयार करण्याचा विभाग, त्यामधील ताम्र–लोह–अभ्रक वगैरे तयार भस्में, त्याचप्रमाणें सुवर्णराज वंगेश्वर-रससिंदूर–समीरपन्नग वगैरे कुपिस्थ रसायनें यांचा अभ्यासशील दृष्टीनें सिद्धौषधींचा मोठा संग्रह पाहून त्यांनीं पूर्व सनातन आयुर्वेद शास्त्राबद्दल धन्योद्गार काढले. हातीनें केलेल्या प्रमाणशीर गुटिका–वटिका, यांत्रिक सहाय्य न घेतां केलेलीं चूर्णें वगैरेबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैद्यराज आबासाहेब सांडू यांनीं सर्व मंडळींचें प्रेमपूर्वक स्वागत करून कंपनीचे कामासंबंधींची ४५ वर्षांची आरंभापासूनची हकीगत थोडक्यांत निवेदन केली. कॉफीपान–पानसुपारी झाल्यावर प्राध्यापक भट्टाचार्य यांनीं आपले भाषणांत विद्यार्थीवर्गाला प्रत्यक्ष शिक्षण या दृष्टीनें अशा संस्था उपयुक्त असतात वगैरे आदरयुक्त अभिप्राय व्यक्त केला. कंपनीतर्फे नुकताच तयार झालेला "च्यवनप्राश" सादर भेट म्हणून देण्यांत आल्यावर चालक मंडळींना व त्यांचे कार्याला आशीर्वाद व धन्यवाद देऊन मंडळी परत आपल्या मुंबईतील निवासस्थानीं गेली.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

### संस्थेच्या संवर्धनाच्या योजना

शेतकीविषयक व जंगलविषयक संग्रहालयांच्या संस्थेनें सादर केलेल्या योजनांस मान्यता देऊन मुंबई प्रांतिक सरकारनें या दोन्ही योजनांस मिळून रु. ५,००० ची जादा देणगी मंजूर केली आहे. या दोन खात्यांस स्वतंत्र निरंतरची देणगी देण्याचा विचार चालू आहे.

( २ ) संस्थेनें विनंती केल्यावरून मुंबई प्रांतिक सरकारनें जंगल खात्यामार्फत दांडेली येथून संग्रहालयास यावयाच्या रु. २,००० च्या लांकडाची किंमत रु. १,००० नें कमी करून संस्थेस रु. १,००० ची मदत दिली आहे.

( ३ ) मुंबई प्रांतिक सरकारच्या जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांच्या शिफारसीवरून फर्नीचर करण्यासाठीं सुमारें रु. १,००० किंमतीचें कापीव चंदन दोन मेजासारखी तावदानी कपाटें करावयासाठीं म्हैसूर संस्थानकडून देणगी दाखल मिळालें आहे.


( ४ ) सिलोन सरकारनें जंगल संग्रहालयास मदत म्हणून महॉगनी, एबनी, सॅटिन, ओक या पहिल्या वर्गाच्या उंची लाकडाचे १० फूट लांबीचे चार ओंडे म्यूझियम संस्थेस देणगी दाखल देऊं केले आहेत.

( ५ ) कँटोनमेंट म्युनिसिपॅलिटीनें चालू सालासाठीं रु. ५०० व सबर्बन म्युनिसिपॅलिटीनें रु. २,००० देणगीदाखल दिले आहेत. टाटा दिनानिमित्त भरणाऱ्या पेटंट व कल्पकतांच्या प्रदर्शनासाठी सबर्बन म्युनिसिपॅलिटीनें आपला काउन्सिल हॉल देऊं केला आहे.

( ६ ) 'प्लास्टिक्स: सायंटिफिक अँड टेक्नॉलॉजिकल', लेखक मि. रोनाल्ड फ्लेक यांचें ३० शिलिंग किंमतीचें पुस्तक इंग्लिश युनिव्हर्सिटीज प्रेस, लंडन यांचेकडून संस्थेच्या वाचनालयास देणगीदाखल मिळालें आहे. त्याचप्रमाणें "कार्डबोर्ड क्रॅफ्ट" हें पुस्तक दि मॅन्युफॅक्चर ऑफ पेपर कन्टेनर, व्हर्स्टोन अँड कं., लंडन यांचेकडून मिळालें आहे.

**जागतिक बँकेचे ३९ सभासद**—इंटर नॅशनल बँकेचे आतां ३९ सभासद झाले आहेत. ऑस्ट्रेलिया, सैबेरिया, न्यूझीलंड, रशिया व नेपाळएला ह्या राष्ट्रांनीं ब्रेटनवुडस परिषदेंत भाग घेतला, परंतु अद्याप ते बँकेस मिळाले नाहींत.


पेडणेकर आणि कंपनी लि.,
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८





मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.






सांडू
प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व
गर्भ यांस पोषक
डोंगरे
यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
चीफ एजंटः—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.
पंढरीनाथ
ब्रिलिअन्टाईन वापरा




## हिंदी आयुर्विमा व्यवसाय—कंपन्याची वर्गवारी

आयुर्विम्याचें व इतर विम्याचें काम करणाऱ्या हिंदी कंपन्यांची त्यांच्या मुख्य कचेऱ्या कोणत्या प्रांतांत आहेत, त्याप्रमाणें वर्गवारी खाली दिली आहेः—

| प्रांत | आयुर्विम्याचें काम | आयुर्विमा व इतर विमे | फक्त इतर विमे | एकूण कंपन्या |
|---|---|---|---|---|
| मुंबई | ४९ | २५ | १४ | ८८ |
| बंगाल | ४२ | ६ | ११ | ५९ |
| मद्रास | १९ | ६ | ९ | ३४ |
| पंजाब | ११ | ४ | २ | १७ |
| दिल्ली | ८ | ३ | १ | १२ |
| संयुक्त प्रांत | ८ | २ | — | १० |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | ३ | — | — | ३ |
| सिंध | ३ | — | २ | ५ |
| बिहार | १ | — | — | १ |
| आसाम | १ | — | — | १ |
| अजमीर–मारवाड | — | १ | — | १ |
| हिंदी संस्थानें | ७ | १ | — | ८ |
| एकूण | १५२ | ४८ | ३९ | २३९ |

हिंदुस्थानांत काम करणाऱ्या विदेशी कंपन्यांची संख्या १०१ आहे. त्यांपैकी ६७ ब्रिटिश आहेत. ह्या ६७ पैकी ५६ कंपन्या आयुर्विम्याचें काम न करतां फक्त आग, मरीन, इत्यादि कामें करतात.

## जिंदगीची गुंतवणूक

हिंदी कंपन्यांची एकूण जिंदगी ३१–१२–४५ रोजीं १३७ कोटि, ८३ लक्ष रुपये भरली व ती खालील प्रमाणें गुंतविण्यांत आली होतीः—

| कशांत गुंतविली ? | रकम ( लक्ष रु. ) |
|---|---|
| हिं. सरकारचे रोखे | ८७,२० |
| हिंदी संस्थानांचे रोखे | ९५ |
| ब्रिटिश, ब्रि. साम्राज्यांतर्गत व विदेशी रोखे | १,३१ |
| म्युनिसिपल, पोर्टट्रस्ट व इं.ट्रस्ट रोखे | ६,८६ |
| मालमत्तेचें गहाण | १,३६ |
| पॉलिसींचे तारणावर कर्जें | ६,७२ |
| स्टॉक्स व शेअर्सवर कर्जें | २३ |
| इतर कर्जें | ५४ |
| हिंदी कंपन्यांचे भाग | १३,०४ |
| जमीन व इमारती | ५,५५ |
| एजंटांकडे येणें, येणें हप्ते व व्याज इ. | ६,३० |
| अनामत, रोख व तिकिटें | ६,३७ |
| किरकोळ | १,४० |

## दि टेक्स्टाइल लेदर वर्क्स लि., मुंबई

२२ ऑक्टोबर १९४५ ते ३० जून १९४६ अखेरचा वरील कंपनीचा आढावा, घसारा काढल्यावर ९,७२८ रु. नफा दर्शवितो. अहवालाचे काळांत कंपनीला टॅनरीचे बाबत आलेल्या अडचणींचें निवारण झालें असून कमावलेलें कापड पक्का माल बनविण्यासाठीं तिला मोठ्या प्रमाणावर मिळूं शकेल. कंपनीचें वसूल भांडवल २,३३,८५० रुपये असून तिचेकडे एकूण ४ लक्ष, ८ हजारांच्या ठेवी आहेत. शेअर भांडवलांतील वाढ ह्या ठेवींची आवश्यकता बऱ्याच अंशानें कमी करून व्याजांत बचत करील, अशी अपेक्षा आहे. अहवालाचे मुदतींत कंपनीनें १ लक्ष, ९१ हजारांची विक्री केली. शिलकी माल व स्टोअर्स ह्यांची किंमत ३ लक्ष, ८६ हजार रुपये आहे. श्री. पुरुषोत्तम काशिनाथ गोडबोले हे कंपनीचे चेअरमन असून मेसर्स चिकेरूर गोडबोले आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

## बँकांच्या भांडवलासंबंधीं कायदा

### सिलेक्ट कमिटीच्या शिफारसी

बँकिंग बिलावरील सिलेक्ट कमिटीची सभा असेंब्लीचे उपाध्यक्ष सर मेहमद यामिन खान ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकतीच भरून, तिनें बँकांच्या भांडवलाबाबत खालीलप्रमाणें निर्णय ठरवल्याचें समजतें.—

( १ ) एका जिल्ह्यांत, एका कचेरीचें काम करणाऱ्या बँकेस ५०,००० रु. वसूल भांडवल व रिझर्व.

( २ ) त्याच जिल्ह्यांत शाखा असल्यास, १,००,००० रुपये भांडवल अधिक प्रत्येक शाखेचें १०,००० रु. भांडवल.

( ३ ) जिल्ह्याबाहेर परंतु प्रांतांत शाखा काढण्यास प्रत्येक शाखेस २५,००० रु. भांडवल.

( ४ ) रिझर्व्ह बँकेनें ठरविलेल्या कक्षेत कोठेंहि काम करण्यास ५,००,००० रु. भांडवल.

( ५ ) हिंदुस्थानांत कोठेंहि काम करण्यास १०,००,००० रु. भांडवल.

( ६ ) कलकत्ता व मुंबई येथें काम करण्यास ५,००,००० रु. भांडवल जादा.

( ७ ) १ लक्ष ते २ लक्ष लोकवस्तीच्या जागीं व प्रांतांच्या राजधान्यांत काम करण्यास २,००,००० रु. भांडवल.

( ८ ) एका प्रांतांतील बँकेस शेजारच्या प्रांतांत आपल्या मुख्य कचेरीपासून २ ५ मैलांचे आवारांत शाखा काढण्यास २५,०००रु. जादा भांडवल.

## न्यू सिटिझन बँकेची मुंबईत अपोलो स्ट्रीटवर स्वतःची इमारत

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. नें मुंबई येथील अपोलो स्ट्रीटवरील व्हिक्टोरिया बिल्डिंग नांवाची पांच मजली इमारत ३ लक्ष रुपयांस नुकतीच खरेदी केली आहे. ही इमारत बँकेच्या सध्याच्या इमारतीपासून एक मिनिटाचे अंतरावर आहे. बँकेच्या विस्तारास तिची मुख्य कचेरीची सध्याची जागा अत्यंत अपुरी पडत होती आणि तेथील कांहीं कामाच्या विभागांचें पुणे येथें स्थलांतर करावें लागलें होतें. इमारत खरेदीमुळें ही गैरसोय दूर होऊन बँकेच्या कार्यक्षमतेंत आणखी भर पडेल आणि स्थावर मिळकतीच्या जिंदगीमुळें ताळेबंदही अधिक उठावदार दिसेल, हें उघड आहे. मुंबई येथें बँक स्थापून, ती सत्वर शेड्यूल्ड करून, हिंदुस्थानभर सुमारें ४५ शाखा काढून आणि आतां स्वतःची भव्य इमारत बँकेस उपलब्ध करून देऊन बँकेचे संस्थापक व मॅ. डायरेक्टर श्री. भाऊसाहेब देशपांडे ह्यांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

## बँकिंग कंपनीज ऑर्डिनन्सचा दुसरा बळी

बँकिंग कंपनीज ( इन्स्पेक्शन ) ऑर्डिनन्स ,१९४६ प्रमाणें आर्यन बँक लि. ची तपासणी करण्यास हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेस सांगितलें. त्या तपासणीच्या रिपोर्टाचा सरकारनें विचार करून, ह्या बँकेचा व्यवहार तिच्या ठेवीदारांच्या हितास पोषक नाहीं अशी सरकारची खात्री झाली. आर्यन बँक लि. नें १३ जानेवारी १९४७ नंतर नव्या ठेवी घेऊं नयेत असा सरकारनें हुकूम दिला आहे. आर्यन बँक ही शेड्यूल्ड बँक नाहीं. इंटर नॅशनल बँक ऑफ इंडिया लि. हा वरील ऑर्डिनन्सचा पहिला बळी होय. इतरहि कांहीं बँकांची तपासणी चालू आहे, त्यांतून काय निष्पन्न होतें ह्याकडे हितसंबंधी लोकांचें लक्ष्य लागून राहिलें आहे.

## बँकांचें एकत्रीकरण

युनायटेड सिंध पंजाब बँक लि. व युनायटेड कमर्शिअल बँक लि. ह्यांचें एकत्रीकरण होणार आहे. युनायटेड सिंध पंजाब बँकेच्या शाखा व व्यवहार युनायटेड कमर्शिअल बँक घेईल. पहिल्या बँकेच्या २ शेअर्सला दुसऱ्या बँकेचा १ शेअर मिळेल किंवा प्रत्येक शेअरला ५० रु. रोख दिले जातील.

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. थांजकडून)

सासाहिक बंद भाव

व्याज–वजा

शिंदिया स्टीम रु. १–४–० दि. २०–१–४७

असो. सीमेंट रु. ७ दि. २३–१–४७

व्याज–वजा

+चेलापूर रु. ९ दि. १५–१–४७

सिंप्लेक्स रु. ४ दि. २८–१–४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १४।१।४७ | बुधवार १५।१।४७ | गुरुवार १६।१।४७ | शुक्रवार १७।१।४७ | सोमवार २०।१।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६१७-८; २५२७-८ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २७७५ | २७६५ | २७५० | २७४२—८ | |
| ६२८; ४५७–८ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५०० | ४९८ | ४९४—८ | ४९२—८ | |
| ६५; ३६–४ | ०–८–०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | ३६–१० | ३६–१० | ३७—४ | ३७—६ | |
| ७१-४; ४४–१० | ०–१४–०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ४४–११ | ४४–१३ | ४५–१२ | ४५–१२ | |
| ३२७७-८; २१३३–८ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २९३० | २९१५ | २८९० | २८५० | बाजार बंद |
| ११८०; ८५८ | १२–०–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ९१८ | ९१३ | ९०३ | ८९२ | |
| ९९९; ६६० | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ८२५ | ८३८ | ८३२ | ८२७ | |
| ५६७; ३९८ | ७–०–०S | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ४१३ | ४११ | ४०८ | ४०६ | |
| ५५२; ३१४ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ४१० | ४०८ | ४१२ | ४०७ | |
| ५७१; ३२३ | ६–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३७४ | ३७४ | ३७० | ३६७ | |
| ५९४; ३२५–८ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४३९ | ४३६ | ४३० | ४२५ | |
| ७-४-६; ४-८-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—३—६ | ५—३ | ५—३ | ५—१—६ | |
| २९-१; १६-१२ | ०–१५–८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १९–१३ | १९–१२ | १९–१० | १९—७ | |
| ६-११-६; ३-३-६ | ०–३–० | म | ,, डिफर्डस् | १ | ४—५ | ४—५ | ४—४—६ | ४—४—६ | |
| १०९२–८; ७३५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७९२—८ | ७९२—८ | ८०० | ८०२—८ | |
| २७८; २२५ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२९—८ | २२८—८ | २२७—४ | २२६—८ | |
| ३७५; २४० | ९–०–० | जानेवारी | चेलापूर शुगर | ५० | ३४० | ३३१+ | ३२६ | ३२८ | |
| ९१०; ६०५ | १०–०–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६७२—८ | ६७५ | ६७० | ६६७—८ | |
| ६०-१० ३६-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३–१५ | ४३–१५ | ४३—६ | ४३—४ | |

शुक्रवार दि. १७–१–४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १९३ | आंध्र व्हॅली | १७५० | अलकॉक | ६१७—८ |
| सेंट्रल | १४० | बॉम्बे ट्रॅम | १२५–१२ | बॉंबे स्टीम | ७३७—८ |
| इंडिया | २६१ | टाटा हायड्रो | १९७ | न्यू इंडिया | १०१—८ |
| इंपी० | २७९०० ; ६९५ | टाटा पॉवर | १७६५ | शिवराजपुर | ४८ |
| रिझर्व्ह | १४५—८ | | | टाटा केमिकल | १८—४ |
| | | | | टाटा ऑईल | १०७ |
| | | | | विमको | ६८० |

### चांदीच्या नाण्यांतील चांदी

आपलीं चांदीचीं नाणीं व्यवहारांतून काढून घेऊन त्या चांदीचा उपयोग अमेरिकेकडून उसनी घेतलेली चांदी परत करण्याचा इंग्लंडचा बेत होता.परंतु, नाण्यांतील चांदी गोळा करणें अपेक्षेपेक्षां अवघड जात आहे. ब्रिटिश नाण्यांत फक्त ५०% चांदी असल्याकारणानें ती वितळवून काढणें कठीण पडत आहे. त्यांतील निकेल बाजूस काढणेंहि सोपें नाहीं. ब्रिटिश नाण्यांतील सर्व चांदी १० ते १५ वर्षांत बाजूस काढण्यास समर्थ असणारें यंत्र सबंद जगांत उपलब्ध नाहीं. बरें, ही चांदी वितळवून जमा केली, तरी ती घेण्यास अमेरिका कोठें उत्सुक आहे? नाण्यांसाठी चांदी वापरली जाणें, ही गोष्ट तिचें महत्त्व व किंमत हीं टिकण्याचे दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. परंतु, इंग्लंड व त्याचे मागोमाग इतर देश चांदीच्या नाण्यांचा त्याग करूं लागले तर चांदीचें स्थान खालीं आल्याविना रहाणार नाहीं. चांदीचा औद्योगिक उपयोग असला तरी त्याचें प्रमाण अल्प आहे. हें सर्व जाणून, अमेरिकेस चांदी परत नको आहे, आणि परत फेडीची मुदत लांबविण्याचे प्रयत्न अमेरिकन सरकारनें चालविले आहेत.

**ग्रेट ब्रिटनमधील सरकारी नोकर** — ब्रिटिश सरकारी नोकरांची संख्या ७०,००० नीं कमी करण्यांत येणार आहे, त्यामुळें पगाराच्या खर्चांत सुमारें २५ कोटि रुपयांची वार्षिक बचत होईल. तरी पण, युद्धापूर्वीच्या मानानें नोकरांची संख्या दुपटी इतकी राहीलच.

**अनौरस संतती** — ग्रेट ब्रिटनमध्यें १९४५ मध्यें जन्मलेल्या प्रत्येक ११ मुलांत १ मूल अनौरस असल्याचें आढळलें.

### स्त्रियांच्या सहीमधील "सौ."

बहुतेक विवाहित स्त्रिया आपली सही करतांना, आपल्या नांवामागें 'सौ.' हें अक्षर लिहीत असतात. पुरुषांच्या सहीस 'श्री.' किंवा 'रा.' अशी कधींच सुरवात होत नाहीं, परंतु आपल्या इकडील स्त्रियांच्या भावनांस सहीमध्येंसुद्धां "सौ." ची आवश्यकता भासते. चांगल्या शिकलेल्या स्त्रियासुद्धां त्यास अपवाद नसतात. सहीमध्यें 'सौ." चा अंतर्भाव केल्यानें प्रत्येक वेळेस एक अक्षर ज्यास्त लिहावें लागतें, त्यापेक्षां त्यांत नुकसान काय आहे? असें कोणीहि म्हणणें स्वाभाविक आहे. तथापि प्रत्यक्ष व्यवहारांत कधींकधीं उत्पन्न होणाऱ्या अडचणीकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. एका विवाहित स्त्रीनें पो. ऑ. सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें घेतलीं, त्याचे पैसे मिळण्याची वेळ आली तेव्हां ती स्त्री विधवा झालेली होती. सर्टिफिकिटें विकत घेतेवेळीं तिनें नमुन्याची आपली सही "सौ. —" अशी केली होती. परंतु, सर्टिफिकिटांचे पैसे घेण्याच्या प्रसंगीं तिनें सही करतांना स्वाभाविकपणेंच 'सौ.' हें अक्षर त्यांतून गाळलें. सहीपुरतें तुम्ही आपल्या नांवामागें 'सौ.' असें लिहा, असें बाईंना सांगणें शक्य नव्हतें आणि नमुन्याप्रमाणें सही नसल्याकारणानें पोस्टाचे अधिकारी पैसे देण्यास तयार होईनात. त्यामुळें, बाईंना पैसे मिळण्यास अतिशय अडचण पडून दिरंगाई झाली. सधवा स्त्री विधवा झाल्यामुळें मूळ नमुन्याची सही आपोआप बदलूं शकत नाहीं.

**अमेरिकन वृत्तपत्रांचा कागदाचा उठाव**—अमेरिकन वृत्तपत्रांनीं १९४६ सालीं ३१ लक्ष, ३० हजार टन कागद वापरला. १९४५ सालांतील खपापेक्षा हा आकडा २७.७% नें ज्यास्त आहे.


# टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

## गेल्या बारा वर्षांचा आढावा

| वर्ष | विक्री (कोटि रु.) | निवळ नफा (कोटि रु.) | डिव्हिडंडचा दर ऑर्डिनरी | डिव्हिडंडचा दर डिफर्ड | ऑर्डिनरी शेअर्सच्या किंमती कमाल | ऑर्डिनरी शेअर्सच्या किंमती किमान | डिफर्ड शेअर्सच्या किंमती कमाल | डिफर्ड शेअर्सच्या किंमती किमान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३४–३५ | ७·६१ | २·६८ | नाहीं | नाहीं | १५७—८ | ५६—८ | ७३०—० | २०२—८ |
| १९३५–३६ | ७·४५ | २·४४ | ६–०–० | ७–८–० | १५२—० | १३१—० | ७२०—० | ४६०—० |
| १९३६–३७ | ९·०३ | २·५६ | १०–०–० | ३६–३–६ | ३८८—० | १४७—० | २१५०–० | ५०८—२ |
| १९३७–३८ | १०·९० | ३·६९ | १५–८–० | ७५–११–३ | ३७०—० | २३२—० | १८६०–० | ८९२—८ |
| १९३८–३९ | १२·०८ | ४·३९ | १६–०–० | ९३–१०–५ | ३३४—० | २०५—० | १५६०–० | [illegible]—० |
| १९३९–४० | १३·२८ | ४·९२ | २५–०–० | १४३–१४–७ | ४२७—० | २५१—८ | २२३८–० | ११५३–१२ |
| १९४०–४१ | १७·४३ | ७·०७ | २९–०–० | १७२–१०–० | ४१५—८ | ३१६—८ | २२७७–८ | १६४२–८ |
| १९४१–४२ | १८·१७ | ८·३४ | २७–०–० | १५८–४–४ | ४३३—८ | २८५—० | २३१२–८ | १५२५–० |
| १९४२–४३ | १६·०२ | ६·४९ | २३–०–० | १२९–८–९ | ४०८—० | २३५—० | २०३०–० | १२६०–० |
| १९४३–४४ | २०·४० | ७·७५ | २३–०–० | १२९–८–९ | ४३०—८ | ३६९—८ | २२३५–० | १८४०–० |
| १९४४–४५ | २०·९५ | ८·११ | २३–०–० | १२९–८–९ | ४७७—० | ३७५—८ | २६६१–४ | २०१०–० |
| १९४५–४६ | २०·८४ | ७·७८ | २३–०–० | १२९–८–९ | ६३८—० | ४९५—० | ३६००–० | २१६०–० |

१९३३ सालीं ऑर्डिनरीची कमाल किंमत ४२–८ व किमान किंमत १६–० होती; डिफर्डची तत्सम किंमत २८०–० व १३२–८ होती.

१९३४ मधील ऑर्डिनरी व डिफर्डचे भाव अनुक्रमें ५७–०, ४२–८ व २२८–८ व १६४–६ असे होते.


अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०
हेड ऑफिसः—पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः
अधिकृत भांडवल ... ... रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल ... रु. ७,९३,८१०
वसूल झालेलें भांडवल ... रु. ३,८९,६५५
एकूण खेळतें भांडवल ... रु. ५२ लाखांवर
चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)
o गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
o मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
o बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.